**रेग्यूलर दिवाणी दावा क्र. ४३/२०१४ मधील नि.क्र. ०१ वरील आदेश**

( पारीत दिनांक – ०८/११/२०२३)

लक्ष्मीबाई दत्तु पाटील व ०२ वि. गणपती काळु पाटील व ०३

**CNR -MHKO130001712014**

१. प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादींतर्फे साक्षीदार पांडुरंग पाटील यांच्या सरतपासाचे शपथपत्र हे दि. २९/०३/२०२३ रोजी दाखल करण्यात आले. तद्नंतर, सदर साक्षीदार उलटतपासाकरीता वेळोवेळी गैरहजर राहिले. प्रतिवादीस सदर साक्षीदार यांना हजर राहण्याकरीता वेळोवेळी मुदत देण्यात आली. दि. ०५/१०/२०२३ रोजी सदर साक्षीदार हजर करण्याकरीता प्रतिवादींना शेवटची संधी देण्यात आली. आज पुन्हा सदर साक्षीदार गैरहजर असून प्रतिवादींतर्फे कोणताही अर्ज अभिलेखावर दाखल नाही. प्रतिवादींना त्यांचा पुरावा देण्याकरीता पुरेशी संधी देण्यात आली आहे. वरील सर्व कारणास्तव सर्व प्रतिवादींचा पुरावा बंद करण्यात येतो.

स्वाक्षरी/–.

कागल. **(अमोल भारत जवळे)**

दिनांक – ०८/११/२०२३ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.